# मोलाक्काचा घोडा

एका आटपात नगरात एक व्यापारी राहत होता. त्याला तीन मुले होती. त्यांच्यापैकी कोणालाच व्यापारात स्वारस्य नव्हते. सर्व व्यवहार त्यांचा दिवाणजीच पाहत असे. अचानक एकदा व्यापारी आजारी पडला. मृत्यूपूर्वी त्याने त्याचे इच्छापत्र तयार केले. त्यात त्याने लिहिले, की त्याची अर्धी संपत्ती त्याच्या सर्वात मोठ्या मुलाला मिळावी. राहिलेल्यापैकी अर्धी दुसऱ्या मुलाकडे जावी आणि उरलेल्या संपत्तीतील अर्धी तिसऱ्याला मिळावी. व्यापाऱ्याच्या मृत्यूनंतर मुलांच्या लक्षात आले, की वडिलांकडे फक्त सातच घोडे होते. इच्छापत्राप्रमाणे संपत्तीची वाटणी करायची म्हणजे घोडे कापावे लागतील. यामुळे ते चांगलेच गोंधळून गेले.

मोलाक्का नावाचा चतुर, समंजस माणूस त्यांच्या मदतीला आला. त्याने प्रथम त्याचा घोडा या मुलांना भेट म्हणून दिला. आता वाटणी करण्यासाठी आठ घोडे झाले. इच्छापत्रात लिहिल्याप्रमाणे पहिल्या मुलाला एकूणातील अर्धे, म्हणजे चार घोडे मिळाले. राहिलेल्या चार घोड्यांपैकी अर्धे म्हणजे दोन घोडे दुसऱ्या मुलाला मिळाले. उरलेल्या दोन घोड्यांच्या अर्धे म्हणजे एक घोडा तिसऱ्या मुलाला मिळाला. तिघांना मिळून 4 + 2 + 1 = 7 घोडे मिळाले. मोलाक्का आपल्या घोड्यावर बसून घरी निघून गेला.

